ePaper


# गुन्हा दाखल होताच आव्हाडांकडून थेट आमदारकीच्या राजीनाम्याची घोषणा



| वर्ष - 6 | अंक - 211 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार | दिनांक 14 नोव्हेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


## आतील पानांत


- फुलगावात बंद घरातून ४८ तोळे सोने व ५१ लाखांसह ५५,६८,००० रुपयांची घरफोडी
- कामगार हितासाठी 'शिंदेशाही'त !
- तेलंगणात 'कमळ' फुलणार-मोदी


# ठाकरे सेना 'घायाळ'!

## शहरातील प्रभावाला सुरुंग : शहर शिवसेना (ठाकरे गट) नाममात्र

। पिंपरी-चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरातील शिवसेना (ठाकरे गट) चे अस्तित्व आता नाममात्र उरले आहे. मावळ लोकसभा मतदार संघाचे खासदार श्रीरंग बारणे यांच्यासोबत सेनेतील मोठा गट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या 'बाळासाहेबांची शिवसेना' मध्ये सामील झाला. त्यानंतर कामगार नेते इरफान सय्यद यांनीही 'शिंदेशाहीत' सहभागी होण्याचा निर्णय घेतला.**

२०१७ मध्ये झालेल्या निवडणुकीत पिंपरी-चिंचवड महापालिकेत शिवसेनेचे ९ नगरसेवक निवडून आले होते. त्यापैकी एकाही नगरसेवकाने अद्याप आपली राजकीय भूमिका निश्चित केलेली नाही. अगोदरच सेनेत बारणे, कलाटे आणि निष्ठावंत शिवसेना अशी स्थानिक गटबाजी होती. त्यात आता शिंदे गट आणि ठाकरे गट अशी दरी निर्माण झाली आहे. खासदार बारणे यांनी शिंदे गटाच्या माध्यमातून भाजपाशी जवळीक केली आहे. त्यामुळे महापालिका निवडणुकीत भाजपा आणि बाळासाहेबांची शिवसेना अशी महायुती होईल, यावर शिक्कामोर्तब झाले आहे. त्याचा फायदा बारणे यांना लोकसभा निवडणुकीतसुद्धा होणार आहे. राजकीय सोय म्हणून किंवा हिंदुत्वाच्या विचारांचा पुरस्कार करीत बारणे यांनी २०२४ ची पायाभरणी केली.

दुसरीकडे, कामगार नेते इरफान सय्यद यांचाही प्रभाव पिंपरी-चिंचवडमधील माथाडी कामगार क्षेत्रात आहे. शिरूरचे माजी खासदार शिवाजीराव आढळावर यांचे निकटवर्ती असल्यामुळे सय्यद ठाकरे गटातून बाहेर पडणार अशी चर्चा होती. अखेर त्यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत बाळासाहेबांची शिवसेनामध्ये जाहीर प्रवेश केला.



### संजय राउत यांचे स्वप्न भंगले...

महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात शिवसेनेमध्ये उत्साह संचारला होता. त्यावेळी खासदार संजय राउत यांनी पिंपरी-चिंचवड दौऱ्यात मोठे विधान केले होते. "पिंपरी-चिंचवडचा पुढचा महापौर शिवसेनेचा असेल" असा दावा त्यांनी केला होता. मात्र, अल्पावधीत महाविकास आघाडी सरकार पडले आणि शिवसेनेला अहोटी लागली. आजच्या घडीला शहरातील ९ माजी नगरसेवकांपैकी किती ठाकरे गटासोबत राहतील की, शिंदेगटात सहभागी होतील, याबाबत शाश्वती नाही. त्यामुळे राउत यांचे महापौर बसवण्याचे स्वप्न सत्यात उतरण्याची सूतराम शक्यता नाही.

### सुलभा उबाळे, धनंजय आल्हाट यांच्या भूमिकेकडे लक्ष...

कामगार नेते इरफान सय्यद यांच्यानंतर आता भोसरी विधानसभा मतदार संघातील शिवसेनेच्या माजी गटनेत्या सुलभा उबाळे आणि माजी नगरसेवक धनंजय आल्हाट यांची काय भूमिका असेल? याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. वास्तविक, उबाळे आणि आल्हाट यांचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यासोबत सलोख्याचे संबंध आहेत. दोन्ही नेत्यांना महापालिका सभागृहात प्रवेश करण्यास पहिले प्राधान्य द्यावे लागणार आहे. त्यामुळे ठाकरे गट म्हणजे बुडते जहाज... अशा भूमिकेतून उबाळे आणि आल्हाट दोघेही शिंदे गटासोबत जाण्याचा निर्णय घेतील. कारण, महापालिकेत भाजपा आणि बाळासाहेबांची शिवसेना अशी महायुती होणार असून, त्याचा फायदा निवडणुकीत विजयापर्यंत पोहोचण्यासाठी होईल, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

# सफाई कामगार 'वंचित'!

## सुट्टीतील कामाचे पैसे मिळेना : राष्ट्रीय अनुसूचित आयोगाची पालिकेला नोटीस

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांना हक्काचे अतिरिक्त वेतन अद्यापही अदा करलेले नाही. त्या बाबतची माहिती सात दिवसांत देण्याची सुचना राष्ट्रीय अनुसुचित जाती आयोगाने आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे केली आहे. महापालिका आयुक्तांना नोटीस बजावत आयोगाने ही माहिती मागविली असून याबाबत ॲड. सागर चरण यांनी याचिका दाखल केली होती . त्याची दखल घेत आयोगाने ही नोटीस पाठविली आहे.**





सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी काम केल्यानंतर आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना अतिरिक्त वेतन दिले जाते. यंदा महात्मा गांधी जयंती ते घटस्थापनापर्यंत काम करणाऱ्या कामगारांना दिवाळीपुर्वी अतिरिक्त वेतन देणे अपेक्षीत होते. मात्र काही क्षेत्रीय कार्यालय वगळता इतर क्षेत्रीय कार्यालयाकडून त्याची अंमलबजावणी झाली नाही.

सफाई कर्मचाऱ्यांची यातना अधिकाऱ्यांना समजत नाही त्यांना त्यांच्या हक्काचे पैसे वेळेत मिळण्यापासून ठेवले वंचित. सफाई कर्मचाऱ्यांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. या अतिरिक्त मेहनताना चा वापर काही कर्ज फेडण्यासाठी, काही शिक्षण शुल्क भरण्यासाठी, काही आपल्या मुला-मुलींच्या लग्नासाठी करतात व इतर, परंतु अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणा मूळ यावेळी प्रत्येक कर्मचाऱ्याची नशिबात निराशा आलेली आहे. कामगारांना ऐन दिवाळी सणालाच हक्काच्या वेतनापासून वंचित रहावे लागले. त्या बाबत ॲड. सागर चरण यांनी राष्ट्रीय अनुसुचित जाती आयोगाकडे याचिका सादर करत कारवाईची मागणी केली.

### महापालिका प्रशासनाकडे कामगारांचे लक्ष...


**आयोगाने चरण यांच्या तक्रारीची दखल घेऊन आयुक्त शेखर सिंह यांना नुकतीच रोजी नोटीस पाठवली आहे. त्यामध्ये नमूद केले आहे की, संविधानाच्या कलम 338 नुसार या तक्रारीची आयोगाकडून दखल घेऊन संबंधीत प्रकरणाची तपासणी केली जाणार आहे. हे पत्र प्राप्त झाल्यानंतर सात दिवसांच्या आत – संबंधीत कामगारांच्या वेतनाबाबत काय कार्यवाही केली. याचे उत्तर आयोगाकडे पाठवावे. " आयोगाने घेतलेल्या कठोर भूमिकेमुळे पालिका प्रशासन अडचणीत आले असून आयोगाकडून पुढील कार्यवाही काय केली जाते, याकडे कामगारांचे लक्ष लागले आहे.**

# फुलगावात बंद घरातून 48 तोळे सोने व 51 लाखांसह 55,68,000 रुपयांची घरफोडी!

## लोणीकंद पोलिसांसह युनिट सहाची पथके घटनेचा करीत आहे तपास

**। केसनंद। महाईन्यूज।**

**फुलगाव (ता. हवेली) येथे बंद घरातून ४८ तोळे सोने तसेच ५१ लाख रुपयांच्या रोख रक्कमेसह एकुण ५५,६८,००० रुपयांची घरफोडी झाल्याने खळबळ उडाली असून लोणीकंद पोलिसांसह युनिट सहाची पथके या घटनेचा तपास करीत आहेत.**





याबाबत सतीष शिरीष राका (वय ३१, रा. फुलगाव ता. हवेली) यांनी फिर्याद दिली असून लोणीकंद पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फुलगाव येथे सतीष शिरीष राका यांचे पिढीजात किराणा मालाचे जुने दुकान आहे. दिनांक १०/११/२०२२ रोजी दुपारी तीन वाजलेपासून ते दिनांक १३/११/२०२२ रोजी सकाळी आठचे दरम्यान किराणा मालाचे व्यापारी असलेले सतीष शिरीष राका हे बाहेरगावी गेलेले असताना अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप कोयंडा तोडुन घरात प्रवेश केला. तसेच घरातील ४ लाख ६८ हजार रुपये किमतीचे एकुण ४८ तोळे ७ ग्रॅम वजनाचे सोने तसेच ५०० ग्रॅम चांदीचे वडीलोपार्जीत दागीने, त्याचप्रमाणे घरातील रोख ५१ हजार रुपये असा एकुण ५५,६८,००० रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेला.

दरम्यान या घटनेची खबर मिळताच लोणीकंद पोलिसांसह गुन्हे अन्वेषण युनिट सहाच्या पथकाने तातडीने घटनास्थळी भेट देवून तपासाला सुरुवात केली. श्वानपथक, ठसेतज्ञांना पाचारण करण्यात आले तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेजही तपासण्यात आले. तर येरवडा विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त किशोर जाधव, लोणीकंदचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक गजानन पवार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) मारुती पाटील यांनीही घटनास्थळी भेट देवून तपासाच्या सुचना दिल्या. सहाय्यक पोलीस निरीक्षक गजानन जाधव तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक एस.वाय. राजगुरु हे अधिक तपास करीत आहेत.

शेतात पडलेल्या कागदपत्रांमुळे चोरी निदर्शनास, आमदार पवार यांनी हलवली सुत्रे... सतीष शिरीष राका यांची कागदपत्रे गावातील खुळेवस्तीवर शेतात सापडल्यानंतर याबाबत राका यांना विचारणा झाल्यावर चोरीचा प्रकार निदर्शनास आला. याचदरम्यान गावात एका दशक्रियाविधीसाठीउपस्थित असलेल्या आमदार अशोक पवार यांनी या घटनेची गांभीर्याने दखल घेत फोन करुन तातडीने सुत्रे हलवली. दरम्यान पोलिस यंत्रणेनेही घटनास्थळी भेट देत वेगात तपासाला सुरुवात केली. रात्रीचे वेळी कुत्रे भुंकत असतात, मात्र बिबट्या आला असेल या भितीने नागरीक फारसे बाहेर पडत नाहीत.

---

# पुणे-नाशिक रस्त्याची दुरुस्ती दहा दिवसांत न केल्यास...

## खासदार अमोल कोल्हे यांचा संबंधितांना इशारा

**नारायणगाव । महाईन्यूज ।**

पुणे-नाशिक महामार्गावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले असल्याने ते वाहतुकीसाठी धोकादायक झाले आहेत. रस्त्याची दुरुस्ती येत्या दहा दिवसांत पूर्ण न केल्यास त्या खड्डयांमध्ये संबंधित अधिकारी आणि ठेकेदाराच्या नावासह मोबाइल क्रमांकाचे



फलक लावले जातील, असा इशारा खासदार अमोल कोल्हे यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या बैठकीत दिला.

पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील राजगुरुनगर ते आळे फाटा (पुणे जिल्हा हद्द) दरम्यान पर्यायी रस्त्याची कामे आणि सुरक्षा विषयक उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी खासदार कोल्हे यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी आणि संबंधित ठेकेदारांची नुकतीच बैठक घेतली. या बैठकीला राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अनिल गोरड, दिलीप शिंदे आणि सर्व कंत्राटदार प्रतिनिधी उपस्थित होते.

# पुणे-नगर-औरंगाबाद द्रुतगती महामार्गाच्या कामाला वेग

### भूसंपादन अधिकाऱ्यांची नियुक्ती

**पुणे । महाईन्यूज ।**

पुणे-नगर-औरंगाबाद द्रुतगती महामार्गासाठी पुणे जिल्ह्यातील जमीन ताब्यात घेण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी भूसंपादन अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. हा महामार्ग जिल्ह्यातील भोर, पुरंदर, हवेली, दौंड आणि शिरूर तालुक्यातून जाणार आहे.

भारतमाला टप्पा दोन परियोजनेंतर्गत पुणे जिल्ह्यातून ग्रीनफिल्ड राष्ट्रीय महामार्ग जाणार



आहे. भोर तालुक्यातील मौजे कांजळे, वरवे बुद्रुक, कासुर्डी ख.बा., कासुर्डी गु.मा. आणि शिवरे, पुरंदर तालुक्यातील थापेवाडी, वरवडी, गराडे, कोडीत खु., चांबळी, पवारवाडी, सासवड, हिवरे, दिवे, काळेवाडी आणि सोनोरी, हवेली तालुक्यातील आळंदी-म्हातोबाची, तरडे, वळती, शिंदवणे, सोरतापवाडी, कोरेगाव-मूळ, भवारपूर, हिंगणगाव आणि मिरवाडी, दौंड तालुक्यातील दहिटणे, देवकरवाडी, पिलनवाडी, पाटेठाण, तेलेवाडी, राहू, वडगाव बांडे, टाकळी आणि पानवली, शिरूर तालुक्यातील उराळगाव, सत्कारवाडी, दहीवाडी, आंबळे, करडे, बाभुळसर खु., रांजणगाव गणपती, करेगाव, चव्हाणवाडी आणि गोळेगाव या गावांतून जाणार आहे. या पाच तालुक्यांमधील ४४ गावांमधून जाणार आहे.

---

### लहुजी वस्ताद साळवे यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला

# अरुण कुमार स्टेडियम मध्ये दिव्यांचा झगमगाट!

**कँटोन्मेंट । महाईन्यूज।**

**आद्यक्रांती गुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या २२८व्या जयंती निमित्त पूर्वसंध्येला मातंग एकता आंदोलनच्या वतीने भवानी पेठेतील जन.अरुण कुमार वैद्य स्टेडियम येथे करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थापक अध्यक्ष रमेश बागवे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रमेश बागवे म्हणाले की, या देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी सर्वात मोठे आद्य क्रांती गुरू लाभले आहे.**



त्यांचे ध्येय म्हणजे जगेल तर देशासाठी मरेल तर देशासाठी अशा प्रखर राष्ट्र प्रेम असणाऱ्या महापुरुषाने अनेक क्रांतिकारक घडवले आहे. आजच्या पिढीने त्यांचे विचार आत्मसात करण्याची खरी गरज आहे.

आज त्यांच्या क्रांतीचा विचार करता राज्य व देश पातळीवर त्यांचा यथोचित गौरव किंवा स्मारक उभे करण्यात आली नाही नसल्याची खंत ही यावेळी बागवे यांनी व्यक्त केली.

यावेळी कार्याध्यक्ष अविनाश बागवे यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. यावेळी छाया लांडगे यांनी काढलेली रांगोळी ही अनेकांचे लक्ष वेधून होती. दिपोस्त्वानंतर फटाक्यांची मोठी आतिषबाजी करण्यात आली.

याप्रसंगी मातंग समाजाचे जेष्ठ नेते अंक्कल सोनावणे, विठ्ठल थोरात, अध्यक्ष पुणे शहर अध्यक्षा ॲड राजश्री अडसुळ, पुणे शहर महिला अध्यक्षा सुरेखा खंडाळे, अरुण गायकवाड, मधुकर चांदणे , संजय साठे, दयानंद अडागळे, सुनिल बावकर, मारुती कसबे, रोहीत अवचिते , हुसेन शेख, सचिन वाघमारे, लक्ष्मण चव्हाण, अदित्य गायकवाड, आदी व मान्यवर व महीला मोठ्या संख्खेने उपस्थित होत्या.

# कामगार हितासाठी 'शिंदेशाही'त !

## कामगार नेते इरफान सय्यद : उद्धव ठाकरे गटाला धक्का

**पिंपरी-चिंचवड ।।**
**महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी चिंचवड शहर शिवसेनेचे आणि पक्षातील जुने-जाणते दिग्गज नेतृत्व इरफानभाई सय्यद यांनी ठाकरे गटाला सोडचिठ्ठी देत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची साथ धरली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बालेकिल्ल्यात ठाणे येथील टेंबी नाका येथे मुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत आज रविवारी (दि. १३) रोजी शिवसनेच्या बाळासाहेब ठाकरे पक्षात त्यांनी जाहीर प्रवेश केला आहे.**



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी इरफान सय्यद यांचे पक्षात जोरदार स्वागत केले आहे. त्यांच्याकडे पक्षाच्या उपनेतेपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. बाळासाहेबांच्या शिवसेनेचा अल्पसंख्याक चेहरा म्हणूनही सय्यद यांच्याकडे पाहिले जात असल्यामुळे अल्पसंख्याक विभागाची जबाबदारीही इरफान सय्यद यांना देण्यात आली आहे. कामगार चळवळीतील शिवसेनेचं असामान्य नेतृत्व म्हणून इरफान सय्यद यांची ओळख आहे. त्यामुळेच त्यांना ठाकरे गटातील एकनिष्ठ मानलं जात होतं. पण त्यांनीदेखील शिंदे गटात प्रवेश केला आहे.

एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर इरफान सय्यद यांनी त्यांची भेट घेतली होती. त्यावेळी इरफान सय्यद यांनी शिंदेंच्या भूमिकेचं कौतुक केलं होतं. परंतु ते आमच्या पक्षातील नेते आणि हितचिंतक देखील होते, त्यामुळे त्यांची भेट घेतल्याची सरवासारव त्यावेळी सय्यद यांनी केली होती. परंतु ते शिंदे गटात सामील होतील अशी सुतराम शक्यता कोणालाच नव्हती. इरफान सय्यद यांनी अनेक कार्यकर्ते घडवले आहेत. त्यामुळे त्यांच्यासोबत युवकांची मोठी फौजही शिंदे गटात सामील होईल अशी शक्यता आहे. त्यामुळे ठाकरे यांच्या पिंपरी चिंचवड शहर शिवसेनेचा बुरुज ढासळू शकतो, अशी शक्यता आहे.

> **"महाराष्ट्र मजदूर संघटनेच्या माध्यमातून गेल्या १० वर्षापासून पुणे जिल्ह्यातील असंघटित क्षेत्रातील माथाडी, मापाडी, बांधकाम कामगारांचे प्रश्न शासन दरबारी पटलावर मांडले. त्यांच्या समस्यांचे निवारण केले. कामगारांची ताकद शिवसेनच्या मागे उभी केली. परंतु आम्ही सत्तेत असताना देखील कामगारांच्या हितासाठी अनेक योजना शासनाकडे सुचवूनही त्याला अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे कामगारांच्या हितासाठी खऱ्या बाळासाहेबांच्या पक्षात प्रवेश केला आहे. राज्यात सत्तेत असल्यामुळे कामगारांच्या हितासाठी भरीव मदत देण्याचे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहे. "**
>
> **– इरफान सय्यद, कामगार नेते.**

### महापालिका निवडणुकीत मूळ सेनेचा सुपडा साफ?

**इरफान सय्यद हे राज्याच्या कामगार सल्लगार समितीचे सदस्य, महाराष्ट्र मजदूर संघटनेचे अध्यक्ष आणि भारतीय कामगार सेना महासंघाचे राज्य उपाध्यक्ष आहेत. यापूर्वी मावळचे खासदार श्रीरंग बारणे, शिरूरचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील बाळासाहेबांच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. आता त्यांच्या पाठोपाठ पुणे जिल्ह्यातील माथाडी कामगारांचे नेते इरफान सय्यद यांनीही पक्षाची साथ सोडल्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीत उद्धव ठाकरेंना मोठा पराभव पत्करावा लागू शकतो, अशी शक्यता राजकीय जाणकार व्यक्त करीत आहेत.**

---

# 'बाईक राईड'द्वारे जवानांना मानवंदना!

## वाकडमधील तरुणांचा आदर्श : माजी नगरसेवक शंकर जगताप यांच्या शुभेच्छा!

**पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**भारताच्या अमृत महोत्सवानिमित्त वाकडमधील पाच बाईक रायडर तरूणांनी देशाची अविरत सेवा करणाऱ्या जवानांना मानवंदना देण्यासाठी पुणे ते अरुणाचल प्रदेशमधील काहो ते परत पुणे असा साडेआठ हजार किलोमीटरचा प्रवास करण्यास सुरूवात केली आहे. या पाचही तरुणांना भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप यांनी सुरक्षित प्रवासासाठी शनिवारी (दि. १२) शुभेच्छा दिल्या. देशभावना जागृत करण्यासाठी आणि देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांचे मनोबल वाढवण्यासाठी अधिकाधिक तरुणांनी अशा मोहिमा राबवाव्यात, असे मत शंकर जगताप यांनी व्यक्त केले.**



देशभरात भारताच्या स्वातंत्र्यांचा अमृत महोत्सव साजरा होत आहे. त्यानिमित्त वाकडमधील पाच बाईक रायडर तरुणांनी एकत्र येत देशाची अविरत सेवा करणाऱ्या जवानांना अनोख्या पद्धतीने मानवंदना देण्याचा निर्णय घेतला. हे पाचही बाईक रायडर तरुण पुणे ते गुजरातमधील नारायण सरोवर पुढे अरूणाचल प्रदेशमधील काहो ते पुन्हा पुणे असा तब्बल ८ हजार ५०० किलोमीटरचा प्रवास करणार आहेत. या प्रवासाला त्यांनी आजपासून (शनिवार) सुरूवात केली आहे.

वैभव रहाटे, राहुल मोकाशी, संदीप कटके, राहुल हंकारे, महेंद्र शेवाळे असे त्या पाच बाईक रायडर तरुणांची नावे आहेत. त्यांची ही बाईक राईड इंडिया बुक रेकॉर्डस आणि एशियन रेकॉर्डसमध्ये नोंदवली जाणार आहे. या बाईक राईडला उद्योजक कुणाल मराठे यांनी प्रोत्साहन दिले आहे.

या पाचही तरुणांच्या प्रवासाला भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप यांनी शुभेच्छा दिल्या. नागरिकांमध्ये देशभावना जागृत करण्यासाठी आणि देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांचे मनोबल वाढवण्यासाठी अधिकाधिक तरुणांनी अशा मोहिमा राबवाव्यात, असे मतही त्यांनी व्यक्त केले.

यावेळी माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके, माजी नगरसेवक सागर अंगोळकर, अंबरनाथ कांबळे, विनायक गायकवाड, संजय मराठे, साई कोंढरे, संकेत कुटे आदी उपस्थित होते.

### इंडिया बूक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद...

**दरम्यान, याच पाच बाईक रायडर तरुणांनी २०१९ मध्ये कन्याकुमारी ते लद्दाख ते पुणे असा ८ हजार किलोमीटरचा प्रवास केला होता. या प्रवासात त्यांनी "से नो टू प्लॅस्टिक" म्हणजेच पर्यावरणाला धोका असलेल्या प्लॅस्टिकचा वापर करू नका, असा संदेश दिला होता. या बाईक रायडची इंडिया बुक्स ऑफ रेकॉर्ड अँड वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे.**

## संपादकीय »

# हवा नवा तो नूर...

***‘खेळात हारजीत व्हायचीच, पण खिलाडूवृत्ती जिंकली पाहिजे’, असा सुविचार अनेकदा तोंडावर फेकला जातो. वास्तवात असले काही नसते. जिंकण्यासाठीच मैदानात उतरायचे असते***

भारतीय क्रिकेट संघ दरवेळी मैदानात उतरतो, तेव्हा तो फक्त अकरा जणांचा संघ नसतो. देशभरातले कोट्यवधी क्रिकेटवेडे त्यांच्याबरोबरीने- मनाने का होईना- मैदानात उतरलेले असतात. जिंकतो, तेव्हा तो अकरा जणांचा संघ नसतो, सारा देश जणू त्या विजयाचा भागीदार असतो. पराभवाला मात्र मायबाप नसतात. ते पाप अकरा जणांचे! हे पूर्वापार चालत आले आहे. ऑस्ट्रेलियात अॅडलेड येथे ‘टी-ट्वेंटी’ विश्वकरंडकाच्या उपांत्य लढतीत इंग्लंडने कुठलाही मुलाहिजा न राखता भारतीय संघाचे आव्हान अक्षरश: चिरडून टाकले, त्यामुळे उभ्या भारतातील असंख्य क्रिकेटवेड्यांचा हिरमोड झाला. भारताचा संघ उपांत्य लढत जिंकणार, आणि नंतर अंतिम झुंजीत पाकिस्तानचा ‘नक्षा’ उतरवणार, असली दिवास्वप्ने पाहण्यात गेले काही दिवस गेले. प्रत्यक्षात उपांत्य लढतीतच सारी ‘मसलत’ फसली. हिरमोड होणे स्वाभाविकच आहे, कारण क्रिकेट हा खेळ आपल्या भारतीय पिंडाचाच एक भाग झाल्यासारखा आहे. आयसीसी ‘टी-ट्वेंटी’ करंडक जिंकूनही आता जवळपास १५ वर्षे झाली. यापूर्वी महेंद्रसिंह धोनीच्या नेतृत्त्वाखाली भारतीय संघाने २००७ मध्ये हा पराक्रम करुन दाखवला होता. मधल्या काळात पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. संघ बराचसा बदलला आहे, इतकेच नव्हे तर बदललेला संघही आता जुना वाटू लागला आहे. माणसाने वाईटातून चांगले शोधावे. पराभवातून काही धडे घ्यावेत.

भारतीय संघाच्या गुरुवारच्या पराभवाने काही चांगल्या गोष्टीही घडल्या आहेत. एक म्हणजे, भारतीय संघाचे ‘टी-ट्वेंटी’ आकृतिबंधातले क्रिकेट आता सपशेल कालबाह्य ठरले आहे, हा साक्षात्कार झाला. या संघातले बरेचसे ज्येष्ठ क्रिकेटपटू आता थकले आहेत, हा दुसरा साक्षात्कार. नजीकच्या काळात संघाच्या खेळाची शैली आणि संघातील खेळाडू, सरावाची पद्धत आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधला ठरीव वावर याबाबतीत काही मूलभूत बदल करावे लागणार आहेत, याची दुखरी जाणीव झाली. इंग्लंडच्या गोलंदाजांसमोर ना आपले फलंदाज धड टिकले, ना त्यांच्या फलंदाजांना रोखता आले. भारताने कसेबसे उभे केलेले १६९ धावांचे माफक आव्हान जोस बटलर आणि अलेक्स हेल्स या बिनीच्या जोडीने अवघ्या १६ षटकांत पार करून दाखवले. दरम्यान, भारतीय गोलंदाजीची मात्र अक्षरश: पिसे निघाली. सामना टीव्हीवर बघताना तर आपल्या संघाला ‘क्रिकेट हा खेळ तरी धड येतो का?’ असे रसिकांना वाटले असणार! विराट कोहली आणि हार्दिक पंड्या ही जोडी टिकाव धरून राहिली नसती तर भारताचा डाव अवघ्या काही धावांत गुंडाळला गेला असता.

# लाल परी का धावू लागली?






पुढील वर्षी एक जूनला एसटीचे अमृतमहोत्सवी वर्ष पूर्ण होत आहे. त्यापूर्वी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब असलेल्या दोन हजार इलेक्ट्रिक बस व दोन हजार डिझेल बस ताफ्यात दाखल होत आहेत. हा निर्णय संचालक मंडळाच्या बैठकीत मान्य होईल. ही आनंदाची बाब आहे. हे या आधीच व्हायला हवे होते. ते का झाले नाही? हा प्रश्नसुद्धा उपस्थित होतो. खाजगी बसच्या स्पर्धेत अशी अत्याधुनिक वाहने रस्त्यावर आणणे, यापूर्वीच शक्य होते. मात्र, निव्वळ राजकीय उदासिनतेमुळे व राजकारणी मंडळींचे खासगी वाहतूकदारांशी छुपे लागेबांधे असल्याने ते घडले नाही. राजकीय हस्तक्षेपामुळे लाल परीच्या मार्गात अनेक अडथळे आले. आता राजकीय हस्तक्षेप नसल्याने व सातत्याने होणारा इतर हस्तक्षेप थांबल्याने लाल परीचा वेग सुसाट झाला आहे. तो नक्की वाढेल अशी आशा आहे. करोनाकाळ आणि कामगारांचा संप यामुळे गेली अडीच ते तीन वर्षे आर्थिक गर्तेत सापडलेल्या एसटीला एकाच वेळी अनेक समस्यांचा सामना करावा लागतो आहे. करोनापूर्व काळात दररोज सुमारे ६५-७० लाख प्रवाशांची ने-आण करणारी एसटी खऱ्या अर्थाने महाराष्ट्राची ‘लोकवाहिनी’ बनली. पण मधल्या काळात हा आकडा एकदम कमी होऊन २८ लाख प्रवाशी वाहतूक व फक्त १२ ते १३ कोटी रुपये दिवसाचे उत्पन्न अशी स्थिती झाली होती. सध्या वापरात फक्त १३ हजार ५०० गाड्या आहेत. प्रवाशांच्या मागणीच्या तुलनेत त्या खूपच कमी आहेत. गेल्या तीस वर्षापासून १२ ते १८ हजार इतक्या गाड्या वापरात होत्या. त्यात नवीन गाड्यांची संख्या दर वर्षी एक ते दोन हजारांनी वाढत होती. पण एसटी आर्थिक गर्तेत सापडल्याने तसेच गेल्या काही वर्षांत गाड्या खरेदी बंद झाल्याने व गाड्या कमी पडत असल्याने प्रवाशांना सेवा देण्यात एसटी कमी पडली. मग मोठ्या प्रमाणात एसटीच्या हक्काच्या प्रवाशांनी खासगी वाहतुकीचा पर्याय निवडला. काही प्रवाशांना तो सुलभ वाटू लागल्याने ते कायम त्याकडे वळले आहेत. तरीही करोना आटोक्यात आल्याने पुन्हा प्रवाशी खऱ्याखुऱ्या लोकवाहिनीकडे वळू लागला आहे. त्यामुळे प्रवासी संख्येत अचानक मोठी अनपेक्षित वाढ झाली. दिवाळीत हंगामी दरवाढ केल्यानंतर २१ ते ३१ ऑक्टोबर या काळात सुमारे चार कोटी ९५ लाख लोकांनी एसटीतून प्रवास केला. त्यामुळे २७५ कोटी रुपयांचे भरघोस उत्पन्न एसटीला मिळाले.

यातल्या एके दिवशी तर २५ कोटी ४७ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले. हा दहा वर्षांतील उच्चांकी आकडा होता. १६ हजार ५०० गाड्या रस्त्यावर असतानाही एवढी प्रवासी संख्यावाढ कधी झाली नव्हती. पण हे अचानक असे घडले कसे? याचे स्पष्ट उत्तर आहे. गेल्या चार महिन्यांपासून एसटीला परिवहन मंत्री व अध्यक्ष नाहीत. सध्या ही दोन्ही पदे मुख्यमंत्री स्वतः सांभाळत आहेत. त्यामुळे मंत्री व अध्यक्षांचा जो दैनंदिन हस्तक्षेप होता, तो पूर्णतः बंद झाला आहे. एकंदर ७५ वर्षांतील आढावा घेतला असता एसटी महामंडळाला या राजकीय लोकांमुळे खूप नुकसान सोसावे लागले आहे. मंत्री आणि अध्यक्ष यांच्यासाठी वापरण्यात येणाऱ्या गाड्या व त्यांच्या कार्यालयातला कर्मचारी वर्ग यांची संख्याही खूप मोठी असते. साहजिकच जे गाड्या चालविण्यासाठी चालक देण्यात येतात किंवा कार्यालयीन कामासाठी जे कर्मचारी देण्यात येतात, त्यांच्या अतिकालिक भत्त्याची रक्कम दर महिन्याला कित्येक लाख रुपयांची होत असते. नियम डावलून हे कर्मचारी वापरले जात असत. त्यामुळेही महामंडळाला मोठा आर्थिक भुर्दंड सोसावा लागला आहे. आमदार, खासदार व लोकप्रतिनिधी यांच्या मागणीनुसार गरज नसताना व अपेक्षित प्रवाशी मिळत नसताना काही मार्गावर तोटा सहन करून फेऱ्या चालवाव्या लागतात. त्यामुळे वर्षाला अंदाजे सातशे कोटी रुपयांचा फटका महामंडळाला बसत आहे. याशिवाय काही ठिकाणी गरज नसताना व तीस किलोमीटर अंतराच्या आत डेपो नसावेत, असे संकेत असताना अनेक ठिकाणी राजकीय पक्ष व नेते, लोकप्रतिनिधी यांच्या दबावामुळे डेपो तयार करण्यात आले. म्हणजे, प्रवाशांच्या संख्येत वाढ न होता तेवढेच प्रवासी वेगवेगळ्या डेपोत व स्थानकावर विभागले गेल्याने वर्षाला साधारण आठशे कोटी रुपयांचे नुकसान होत आहे.

# एक देश, एक वीजजाळे, एक वीज दर

**भारतामधल्या वीज वितरण कंपन्या कोळसानिर्मित वीज मुख्यत: तीन स्रोतांकडून विकत घेतात. पहिला, केंद्र सरकारच्या आधिपत्याखालील वीजनिर्मिती कंपन्या म्हणजे एनटीपीसी, न्यूक्लिअर पॉवर वगैरे. यांची क्षमता सुमारे ६४ हजार मेगावॅट आहे.**



दुसरा स्रोत आहे राज्यांच्या आधिपत्याखालील वीजनिर्मिती कंपन्या म्हणजे महानिर्मिती, एपीजेनको, तमिळनाडू जेनको वगैरे. या सर्वांची क्षमता सुमारे ६७ हजार मेगावॅट आहे. तिसरा स्रोत म्हणजे खासगी कंपन्या. म्हणजे अदानी, रिलायन्स, टाटा, जिंदाल वगैरे. यांची क्षमता ७३ हजार मेगावॅट आहे. सर्वसाधारणपणे हे तिन्ही घटक प्रत्येकी एकतृतीयांश वीज देतात. एक मेगावॅट निर्माण करण्यासाठी सुमारे सहा ते सात कोटी रुपयांची गुंतवणूक करावी लागते. म्हणजे वरील नमूद केलेल्या दोन लाख मेगावॅटसाठी १२ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक झालेली आहे. या सर्व वीजनिर्मिती कंपन्यांबरोबर वीज वितरण कंपन्यांचे दीर्घकालीन करार झालेले आहेत. वीजनिर्मिती कंपनीला त्यामुळे ७५ ते ८५ टक्के एवढी वीजनिर्मिती करणे भाग असते. आणि त्या बदल्यात त्यांना स्थिर आकार वीज वितरण कंपन्यांना द्यावा लागतो. कोळसा वापरून वीजनिर्मिती होत असल्यामुळे जेवढी युनिट वीज विकत घेतली जाते तेवढा प्रति युनिट वीज आकार द्यावा लागतो. हा वीज आकार कोळशाच्या किमतीवर अवलंबून असतो. कोळशाची किंमत ही वेगवेगळय़ा कारणांमुळे दर महिन्याला बदलते आणि त्यामुळे वीज आकारसुद्धा बदलतो. संबंधित कोळसा आयात आहे की भारतीय, तो कोणत्या खाणीतून आला, किती दूरवरून आणला इत्यादी गोष्टींवर कोळशाची किंमत ठरते आणि बदलते.

महाराष्ट्र सुमारे ४४ निर्मिती केंद्रांकडून वीज विकत घेतो. सप्टेंबर २०२२ साठी विंध्याचलचा वीज आकार रु. १.६३ आहे, तर सोलापूरचा रु. ५.८९ आहे. सर्व निर्मिती केंद्रांच्या वीज दराचे असे पत्रक असते, त्याला मेरिट ऑर्डर असे म्हणतात. ही मेरिट ऑर्डर दर महिन्याला प्रसिद्ध केली जाते आणि ती वेगवेगळी असते. मेरिट ऑर्डर कशी वापरतात हे समजून घेण्यासाठी महाराष्ट्राचे उदाहरण घेऊ या. मार्च-एप्रिलमध्ये कमाल मागणी २५ हजार मेगावॅट एवढी होती. तर सध्या पाऊस असल्यामुळे रात्रीची मागणी १४ हजार मेगावॅट एवढी आहे. सध्या सुमारे दोन हजार मेगावॅट एवढी पवनऊर्जा रात्रीसुद्धा निर्माण होत आहे. म्हणजे कोळशापासून फक्त १२ हजार मेगावॅट एवढीच वीज पुरेशी होईल. सप्टेंबरची मेरिट ऑर्डर बघितली, तर विध्याचलच्या रु. १.६३ पैशापासून सुरुवात करून या वीजनिर्मिती केंद्राचे रु. ४.५४ दिले असता १२ हजार मेगावॅट एवढी वीज आपल्याला मिळू शकते. त्याचा वेगळा अर्थ असा, की ४.५५ पैसे ते सोलापूरच्या रु. ५.८९ एवढा वीज आकार असलेली सुमारे १७ निर्मिती केंद्रांकडून आपण एक युनिटसुद्धा वीज विकत घेणार नाही. अर्थात हे सर्वसामान्यांना कळावं असं सोप्या भाषेत लिहिलेलं असलं तर या मेरिट ऑर्डरची अंमलबजावणी यापेक्षा जास्त क्लिष्ट आहे.

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥
- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### जलजीवन मिशन योजनेत जादा दराच्या निविदा भ्रष्टाचारच्या हेतूने- चंद्रकांत पाटील

**। कोल्हापूर । महाईन्यूज ।**

केंद्र सरकारची जल जीवन मिशन ही ग्रामीण भागाला स्वच्छ मुबलक पाणीपुरवठा योजना राबवताना राज्यांमध्ये अंदाजे किंमतीपेक्षा अधिक टक्क्यांनी निविदा भरल्या गेल्या आहेत. यामध्ये भ्रष्टाचार हा एक कलमी कार्यक्रम दिसत आहे, असा आरोप राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी रविवारी येथे केला. जल जीवन मिशनमधील कामांचा आढावा घेताना त्यामध्ये मोठ्या प्रमाणात मागील सरकारने गफला केला आहे, असा आरोप करत पाटील म्हणाले, कोल्हापूर जिल्ह्यातील १२६४ योजनांसाठी १०६४ कोटी रुपये तसेच पुणे जिल्ह्यातील ९०० योजना या अंतर्गत राबवल्या जात आहेत. त्याचा आढावा घेतला असता अंदाजीत रकमेपेक्षा दहा ते पंधरा टक्के इतक्या दराच्या जादा दराच्या निविदा मंजूर केल्या आहेत. या मागची स्पष्टता करण्यात यावी, असे पत्र पुणे व कोल्हापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना देत आहे.

# बाईक रॅली काढत भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे जोरदार शक्तीप्रदर्शन!

## आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाकडून तयारीला वेग

**। नागपूर। महाईन्यूज ।**



राज्यातील शिंदे फडणवीस यांचे सरकार स्थिर असून विधानसभेत आज जरी बहुमत सिध्द करण्याची वेळ आली तर संख्याबळ १६४ वरून १८४ झाल्याचे पाहण्यास मिळेल, असा विश्वास भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. पश्चिम महाराष्ट्र दौऱ्याच्या निमित्ताने बावनकुळे आज सांगलीत आले होते. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले, विरोधक राज्य सरकार कोसळणार असे किती जरी म्हणत असले तरी सरकार भक्कम असून उलट विधानसभेतील ताकद वाढल्याचेच पाहण्यास मिळेल. ज्यावेळी बहुमत सिध्द केले त्यावेळी १६४ आमदार सोबत होते, आता ही संख्या १८४ वर पोहचलेली पाहण्यास मिळेल. उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेने केवळ काँग्रेसची घटनाच स्वीकारण्याचे उरले असून बाकी सर्व काँग्रेसचीच ध्येयधोरणे राबवली जात असल्याचा आरोप करत ते म्हणाले, गजानन कीर्तीकरांसारखे जेष्ठ नेते बाहेर पडून बाळासाहेबांच्या शिवसेनेत सहभागी होत आहेत. याचा ठाकरे यांनी विचार करायला हवा. संजय राउत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटत असतील तर त्याचा राजकीय अर्थ काढण्यात अर्थ नाही. खासदार या नात्याने ते भेटू शकतात. राज्यात ५१ टक्के जागा मिळविण्याचे भाजपाचे लक्ष असून त्यादिशेने प्रयत्न सुरू आहेत. २०२४ च्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी व काँग्रेसला उमेदवार शोधावे लागतील असेही त्यांनी सांगितले. राहूल गांधी यांची भारत जोडो यात्रा काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांनी व त्यांच्या पुत्रांनी हायजॅक केली असून सामान्य कार्यकर्ता मात्र बाजूलाच आहे. एकीकडे भारत जोडो यात्रा सुरू असताना काँग्रेसचे कार्यकर्ते भाजपामध्ये प्रवेश करीत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष सत्तेशिवाय राहूच शकत नाही. पैशातून सत्ता आणि सत्तेतून पैसा हे या पक्षाचे धोरण असून यामुळे या पक्षात केवळ नेत्यांची गर्दी पाहण्यास मिळते.


# चिपळूण : लोटे एमआयडीसी स्फोटाने पुन्हा हादरली!

**। चिपळूण । महाईन्यूज ।**

खेड तालुक्यातील लोटे औद्योगिक वसाहत पुन्हा एकदा स्फोटाने हादरली आहे. लोटे येथील डीवाईन केमिकल कंपनीत सॉलवंट केमिकलने पेट घेतल्याने झालेल्या स्फोटामध्ये कारखान्यातील अनेक कामगार होरपळून जखमी झाले आहेत.

जखमीपैकी काहींची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती उपलब्ध झाली असून प्रार्थमिक माहितीनुसार तिघांना वाशी येथील बर्न हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले आहे. लोटे औद्योगिक वसाहतीतील डिवाईन ही कंपनी २००७ सालापासून कार्यरत असून ही कंपनी औद्योगीक रसायनचे उत्पादन करते. आज सकाळच्या पाळीतील कामगार फेब्रिकेशनचे काम करत असताना अचानक सॉलवंट केमिकलने घेतला पेट घेतला आणि ही दुर्घटना घडली. या अपघातात पहिल्या पाळीत काम करणारे सुमारे १० ते १२ कामगार होरपळून

## अनेक कामगार जखमी



जखमी झाले. जखमी झालेल्या कामगाराना कंपनी व्यवस्थापनाने तात्काळ चिपळूण येथील लाईफ केअर रुग्णालयात उपचारांसाठी नेले मात्र जखमी कामगारांची प्रकृती चिंताजनक असल्याने लाईफ केअर रुग्णालयाच्या व्यवस्थापने जखमी कामगारांना दाखल करून घेण्यास असमर्थता दाखवली. त्यानंतर काहीजणांना अपरान्त रुग्णालयात तर काहीजणांना चिपळूण शहरातील एस एम एस रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जखमी कामगारांपैकी तिघांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना वाशी येथील बर्न हॉस्पिटल मध्ये हलविण्यात आले असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

# शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळांसाठी सोमवारी तीन जिल्ह्यात मतदान; यंत्रणा सज्ज

**।मुंबई । महाईन्यूज ।**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळासाठी उद्या सोमवारी कोल्हापूर, सांगली व सातारा या तीन जिल्ह्यातील ३३ मतदान केंद्रावर मतदान होणार आहे. विद्यापीठ विकास आघाडी, सुटा आणि शिवशाहू आघाडी यांच्यामध्ये हा सामना रंगला आहे. या निवडणुकांसाठी रविवारी १७० केंद्राध्यक्ष व मतदान अधिकाऱ्यांचा ताफा निवडणूक साधनसामग्रीसह रवाना झाला. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव आदींच्या प्रमुख उपस्थितीत २५ वाहने ठिकठिकाणी रवाना झाली.

अधिकार मंडळावर वर्चस्व मिळवण्यासाठी विद्यापीठ विकास आघाडी, सुटा आणि शिवशाहू आघाडीने कंबर कसली आहे. विद्यापीठ विकास आघाडीने प्राचार्य व संस्थाचालक गटातील १६ पैकी १३ जागा बिनविरोध झाल्या आहेत. आघाडीचेच वर्चस्व होईल, असे आघाडी प्रमुख डॉ. संजय डी. पाटील, सचिव डॉ. व्ही. एम. पाटील यांनी म्हटले आहे. तर निवडणुकीत प्रथमच उतरणाऱ्या ठाकरे सेना, डाव्या पक्षांच्या शिवशाहू आघाडीचा कितपत प्रभाव राहणार याचाही या निमित्ताने फैसला होणार आहे



# "मुख्यमंत्री तीन महिने कशात व्यग्र होते, लोकांना माहीत आहे!

## कळवा पुलाच्या श्रेयवादावरून आव्हाडांची टोलेबाजी!

**। ठाणे । महाईन्यूज ।**



**"मागील तीन महिन्यात मुख्यमंत्री कशात व्यग्र होते, हे लोकांना माहीत आहे. या पुलाचं काम २०१४ च्या आधीच सुरू झालं होतं. तेव्हाच याला मंजुरी मिळाली होती. याचा अर्थ त्यावेळी आमदार कोण होतं? आणि तिसऱ्या पुलाची मागणी कोणी केली होती? दुसऱ्या पुलावर प्रचंड वाहतूक कोंडी व्हायची, नागरिकांचा तीन-साडेतीन तास उशीर व्हायचा. तेव्हा तिसऱ्या पुलाची मागणी पुढे आली. त्यानंतर मीच ही मागणी पुढे रेटली, त्यामुळे या पुलाला मंजुरी मिळाली" अशी प्रतिक्रिया जितेंद्र आव्हाडांनी दिली आहे.**

ठाणे आणि कळवा या दोन्ही शहरांना जोडणाऱ्या तिसऱ्या खाडी पुलाचा लोकार्पण सोहळा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होत असताना या पुलाच्या श्रेयावरुन वाद सुरू झाला. जितेंद्र आव्हाड यांनी मुख्यमंत्र्यांना खोचक शब्दांत टोला लगावला. "या पुलासाठीची मागणी मीच पुढे रेटली होती. ती मान्य झाली, पुलाच्या कामाची सुरुवात झाली आणि आज त्याचा शेवट झाला. कुणीतरी असं काम सुरू करतं, उद्घाटनाला दुसरं कुणीतरी असतं. त्यात काय एवढं", असं जितेंद्र आव्हाड म्हणाले.

"मागील तीन महिन्यात मुख्यमंत्री कशात व्यग्र होते, हे लोकांना माहीत आहे. या पुलाचं काम २०१४ च्या आधीच सुरू झालं होतं. तेव्हाच याला मंजुरी मिळाली होती. याचा अर्थ त्यावेळी आमदार कोण होतं? आणि तिसऱ्या पुलाची मागणी कोणी केली होती? दुसऱ्या पुलावर प्रचंड वाहतूक कोंडी व्हायची, नागरिकांचा तीन-साडेतीन तास उशीर व्हायचा. तेव्हा तिसऱ्या पुलाची मागणी पुढे आली. त्यानंतर मीच ही मागणी पुढे रेटली, त्यामुळे या पुलाला मंजुरी मिळाली" अशी प्रतिक्रिया जितेंद्र आव्हाडांनी दिली आहे. "मुळात ही मागणीच माझी होती. यानंतर या पुलाला मंजुरी मिळाली आणि काम सुरू झालं. आज त्याचा शेवट झाला. कुणीतरी काम सुरू करतो आणि उद्घाटन वेगळं कुणीतरी करत असतं, त्यात एवढं मोठं काय..." असा टोलाही आव्हाडांनी लगावला आहे.

या पुलाचं उद्घाटन झालं असलं तरी येथील वाहतूक कोंडी संपणार नाही. या पुलाला कळव्यानंतर दोन विंग्स काढा, ते विंग्स पटनी येथे सोडा. तरच वाहतूक कोंडीचा प्रश्न मिटेल अन्यथा वाहतूक कोंडी कायम राहील, अशी मागणी मी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांच्याकडे केली होती. हीच मागणी मी एकनाथ शिंदे यांच्याकडेही केली आहे.

त्यांनीही हे काम करण्यास सहमती दर्शवली आहे.

# तेलंगणात ‘कमळ’ फुलणार-मोदी!

## तेलंगण राष्ट्र समितीने (टीआरएस) जनतेचा विश्वासघात केला

**। हैदराबाद । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

“तेलंगणात सत्ताधारी तेलंगण राष्ट्र समितीने (टीआरएस) जनतेचा विश्वासघात केला आहे. त्यामुळे आगामी काळात राज्यात सर्वत्र ‘कमळ’ फुलणार आहे,” असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शनिवारी येथे व्यक्त केला.मोदींचे तेलंगणामध्ये शनिवारी दुपारी आगमन झाले. त्यांच्या हस्ते अनेक विकास प्रकल्पांचे उद्घाटन व काही प्रकल्पांची पायाभरणी करण्यात आली. तसेच रामागुंडम येथील खत प्रकल्प राष्ट्राला समर्पित करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते.२०२३



च्या राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदींनी ‘टीआरएस’ला शनिवारी लक्ष्य केले.

तेलंगणामध्ये भाजपकडून के. चंद्रशेखर राव यांच्या नेतृत्वाखालील ‘टीआरएस’ला आव्हान उभे करण्याचा प्रयत्न केला जात आहे.‘टीआरएस’चे नाव न घेता मोदी म्हणाले, की राज्य सरकार व त्यांचे नेते तेलंगणाच्या क्षमतेवर व लोकांच्या प्रतिभेवर अन्याय करत आहेत. माहिती-तंत्रज्ञानासाठी ओळखल्या जाणाऱ्या हैदराबादमध्ये अंधश्रद्धा जोपासल्या जात आहेत. ज्या राजकीय पक्षावर तेलंगणाचा प्रचंड विश्वास होता, त्यानेच नागरिकांचा विश्वासघात केला आहे.

राज्यात मिळणाऱ्या संकेतानुसार येथे लवकरच ‘कमळ’ (भाजपची सरशी होणार) फुलणार आहे. अलीकडच्या पोटनिवडणुकांच्या निकालांचा कल पाहता सूर्योदयास फार विलंब नसल्याचे संकेत मिळाले आहेत. लवकरच अंधार नाहीसा होईल. सर्वत्र कमळ फुलणार आहे.

### घराणेशाहीवर टीका

**के. चंद्रशेखर राव यांचा नामोल्लेख न करता मोदी म्हणाले, की “आता तेलंगणातील मतदारांना एका कुटुंबाऐवजी तेलंगणातील सर्व कुटुंबांसाठी काम करणारे सरकार हवे आहे. त्यांना भाजपचे सरकार हवे आहे.” पक्षाने गेल्या दोन वर्षांत दोन विधानसभा पोटनिवडणुका जिंकल्या. त्याशिवाय यापूर्वी ग्रेटर हैदराबाद महापालिका निवडणुकीत भाजपची कामगिरी चांगली होती.**

## भारत-ब्रिटनला परस्परांची आता अधिक आवश्यकता : जॉन्सन

**नवी दिल्ली :** ब्रिटनचे भारतीय वंशाचे पंतप्रधान ऋषी सुनक यांच्या नेतृत्वाखाली भारत आणि ब्रिटनचे संबंध अभूतपूर्व स्वरूपात पुढे जाणार आहेत, असा विश्वास ब्रिटनचे माजी पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांनी शनिवारी व्यक्त केला. दोन्ही देशांना परस्परांची कधी नव्हती एवढी आवश्यकता आहे, असेही मत त्यांनी या वेळी व्यक्त केले.

दोन्ही देशांनी मुक्त व्यापार कराराला अंतिम रूप देणे आवश्यक आहे. यासाठी पुढील दिवाळीपर्यंत थांबण्याची गरज नाही, असे जॉन्सन यांनी सांगितले. एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी सांगितले की, आपण धोकादायक आणि कठीण कालखंडातून जात आहोत. दोन्ही देशांना

## तुर्कीची राजधानी इस्तंबूलमध्ये भीषण स्फोट; 11 जण जखमी

**।नवी दिल्ली।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

तुर्कस्तानची राजधानी इस्तंबूलच्या ताक्सिम स्क्वेअरमध्ये भीषण बॉम्बस्फोटाची घटना घडली आहे. यात 11 जण जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. रविवारी इस्तंबूलमधील सर्वाधिक गजबजलेल्या प्रसिद्ध इस्तिकलाल शॉपिंग स्ट्रीटमध्ये हा स्फोट झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिक वृत्तानुसार, 4:15 वाजता (तुर्की वेळ) हा स्फोट झाला. या परिसरात अनेक दुकानं आणि रेस्टॉरंट्स असल्याने पर्यटक आणि स्थानिकांमध्ये हे लोकप्रिय ठिकाणं आहे. त्यामुळे नेहमीच या ठिकाणी गर्दी असते. स्फोट झाला त्यावेळी मोठ्या संख्येने लोकं उपस्थित होते. या स्फोटानंतर रुग्णवाहिका, अग्निशमन दल आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. मात्र हा स्फोट नेमका कशामुळे झाला याबाबत कोणतीही माहिती अद्याप मिळू शकलेली नाही. या घटनेनंतर संपूर्ण परिसर रिकामी करण्यात आला आहे. दरम्यान या घटनेचा व्हिडीओ सध्या समोर येत आहेत. ज्यात स्फोटाची तीव्रता कमी असल्याचे दिसतेय.

तुर्कस्तानमध्ये स्फोटाची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी 2017 आणि 2015 मध्ये इस्लामिक स्टेट आणि काही कुर्दिश गटांनी येथे स्फोट घडवून आणले होते.




## गुजरात विधानसभा निवडणुकीत कुटुंबांमध्येच होणार राजकीय लढत

**।नवी दिल्ली।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

गुजरात विधानसभा निवडणुकीसाठी 1 आणि 5 डिसेंबरला मतदान होणार असून, 8 डिसेंबरला जाहीर होणार आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गुजरातमधील सर्वच राजकीय पक्षांनी जोरदार प्रचाराला सुरूवात केली आहे. मात्र यंदाची गुजरातची विधानसभा निवडणुकी विशेष असणार आहे. कारण या निवडणुकीत पिता-पुत्रांसह सख्ख्ये भाऊ, नणंद-भावजय एकमेकांविरोधात लढताना पाहायला मिळणार आहेत.

गुजरातमध्ये विधानसभेच्या या निवडणुकीत काही मतदारसंघ असे आहेत. ज्याठिकाणी भाऊ त्याच्या खऱ्या भावाविरुद्ध लढणार आहे. वहिनी तिच्या खऱ्या मेव्हणीविरुद्ध लढणार आहे. मुलगा त्याच्या वडिलांविरुद्ध निवडणूक लढणार आहे. त्यामुळे यामध्ये कोण बाजी मारणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. याशिवाय, जामनगर उत्तर मतदारसंघातून भाजपने

### सख्ख्ये येणार आमने-सामने




भारतीय क्रिकेटपटू रवींद्र जडेजाची पत्नी रिवाबा सोलंकी यांना उमेदवारी दिली आहे. पण रिवाबा सोलंकी यांची नणंद आणि जाडेजाची मोठी बहीण नयना त्यांना उघडपणे विरोध करत आहेत. तसेच, सूरत जिल्ह्यातील गुजरातमधील झगडिया विधानसभा मतदारसंघात पिता-पुत्रांमध्ये लढत होणार आहे.

ही राजकीय लढाई गुजरातचे सुप्रसिद्ध नेते आणि भारतीय आदिवासी पक्षाचे प्रमुख छोटू भाई वसावा आणि त्यांचा मुलगा महेश वसावा यांच्यात होत आहे. छोटू भाई वसावा हे झगडिया मतदारसंघातून बीटीपीचे उमेदवार आहेत, तर त्यांचा मुलगा महेश वसावा जनता दल यूचे उमेदवार आहेत.

## धक्कादायक! अमेरिकन वायूसेनेच्या दोन विमानांची हवेतच धडक

**।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

अमेरिकेतील डलास एक एयर शोच्या दरम्यान अमेरिकन वायूसेनेच्या दोन विमानांची हवेतच धडक होऊन भीषण अपघात झाला. धडक झाल्याने दोन्ही विमान लगेचच जमिनीवर पडले आणि स्फोट होऊन त्यांचे तुकडे-तुकडे झाले. यूएस फेडर एविएशन ॲडमिनिस्ट्रेशनच्या हवाल्याने याचे वृत्त देण्यात आले आहे.फेडरल एव्हिएशन ॲडमिनिस्ट्रेशन (FAA) नुसार, शनिवारी अमेरिकेतील डॅलस येथे वर्ल्ड वॉर-2 स्मरणार्थी एअरशो आयोजित करण्यात आला होता. हा शो पाहण्यासाठी अनेकांनी हजेरी लावली होती. एअर शो सुरू असताना अचानक बोईंग बी-17 फ्लाइंग फोर्ट्रेस बॉम्बरची दुसऱ्या बेल पी-63 किंगकोब्रा फायटरशी



समोरासमोर टक्कर झाली. डॅलस एक्झिक्युटिव्ह विमानतळाजवळ हा अपघात झाला.

या अपघाताची माहिती मिळताच आपत्कालीन कर्मचारी अपघाताच्या ठिकाणी पोहोचले. त्यानंतर विमानातील क्रू मेंबर्सची चौकशी करण्यात येत आहे. दोन्ही विमानात किती लोक होते हे सध्या स्पष्ट झालेले नाही, अशी माहिती विमानतळाच्या अधिकाऱ्यांनी ट्विटरवर दिली.

हँक कोट्स, स्मरणार्थी हवाई दलाचे (CAF) अध्यक्ष आणि सीईओ, द्वितीय विश्वयुद्धाच्या लढाऊ विमानांचे संरक्षण करण्यासाठी समर्पित गट, यांनी स्पष्ट केले की B-17 मध्ये सामान्यत: चार ते पाच लोकांचा क्रू असतो. कोट्स म्हणाले की पी-63 मध्ये एकच पायलट होता, परंतु अपघाताच्या वेळी विमानात इतर किती लोक होते हे त्यांनी सांगितले नाही.

या विमान अपघाताचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. शो मध्ये सहभागी लोकांद्वारे हा व्हिडिओ कॅप्चर करण्यात आला. हा व्हिडिओ व्हायरल झाला आहे आणि तो अधिकाधिक सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर शेअर केला जात आहे.

या व्हिडिओत एका मोठे विमान सरळ रेषेत उडत आहे. ते जमिनीपासून खूप उंचावर नाही. असे दिसते. त्याच वेळी एक छोटे विमान आपली दिशा बदलून डाव्या बाजूने येते आणि ते सरळसरल या मोठ्या विमानावर आदळून त्याचे तुकडे-तुकडे होतात. त्यामुळे मोठे विमान खाली जमिनीवर येऊन स्फोट होऊन त्याचेही तुकडे तुकडे होतात.

# ओटीटी प्लॅटफॉर्मवर हंसिका मोटवानीच्या लग्नाचे लाईव्ह स्ट्रिमिंग?

सध्या सोशल मीडियावर हंसिका मोटवानी आणि सोहेल खातुरिया यांच्या लग्नाच्या चर्चा रंगल्या आहेत. काही दिवसांपूर्वी हंसिकाने त्यांचे हे गोड गुपित चाहत्यांना सांगितले. इन्स्टाग्रामवर फोटो शेअर करत तिने एंगेजमेंटची घोषणा केली. या फोटोंमध्ये सोहेल तिच्यासमोर गुडघ्यावर बसून तिला प्रपोझ करताना दिसत आहे. त्याने या सुंदर क्षणांसाठी पॅरिसमधील आयफल टॉवरही जागा निवडली होती. हंसिकाच्या या घोषणेनंतर तिने शेअर केलेले फोटो प्रचंड प्रमाणामध्ये व्हायरल झाले. पुढच्या महिन्यामध्ये त्यांचा विवाहसोहळा संपन्न होणार आहे असे म्हटले जात आहे.



सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, जयपूरमधील मुंडोता या ४५० वर्ष जुन्या किल्ल्यामध्ये ते लग्न करणार आहेत. २ डिसेंबर रोजी सूफी नाईट, ३ डिसेंबर रोजी मेहंदी आणि ४ डिसेंबर रोजी भव्यदिव्य लग्नसोहळा असा एकूण कार्यक्रमाचा आराखडा आहे. लग्नानंतर तेथे पोलो मॅच आणि कसिनो थीम असलेल्या आफ्टर पार्टीचे आयोजन केले जाणार आहे. या समारंभाला त्यांच्या परिवारातील सदस्यांसह सिनेसृष्टीतील दिग्गज हजेरी लावणार आहे. उद्योगजगतातले सोहेलचे मित्रही तेथे उपस्थित राहणार आहेत. एका ओटीटी प्लॅटफॉर्मवर त्यांच्या लग्नाचे लाईव्ह स्ट्रीमिंगसुद्धा केले जाणार आहे असे म्हटले जात आहे. याबद्दल त्यांनी कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नसल्याने ही गोष्ट कितपत खरी आहे असा प्रश्न चाहत्यांना पडला आहे. हंसिका मोटवानीचा होणारा पती सोहेल खातुरिया मुंबईचा आहे. तो एक उद्योजक असून मागील अनेक वर्षांपासून ते एकमेकांना ओळखत आहेत. ते दोघे बिझनेस पार्टनर्सही आहेत. एकत्र काम करताना ते एकमेकांच्या प्रेमात पडले. काही काळ डेट केल्यानंतर त्यांनी लग्न करायचा निर्णय घेतला.

२०१६ मध्ये सोहेलचे पहिले लग्न रिंकी बजाजशी झाले होते. गोव्यामध्ये त्यांनी डेस्टिनेशन वेडिंग केले होते. या लग्नात हंसिका मोटवानीदेखील हजर होती. सध्या सोशल मीडियावर सोहेल आणि रिंकीच्या लग्नामधला व्हिडिओ व्हायरल होत आहे. या व्हिडीओत हंसिका डान्स करताना दिसत आहे. काही वर्षांपूर्वी रिंकी आणि सोहेल यांचा घटस्फोट झाला.

# काही निर्माते चहा-कॉफीचेही हिशोब ठेवतात...

निर्माते आणि कलाकार-तंत्रज्ञ यांच्यातील वाद काही नवीन नाही. पण गेल्या काही दिवसात निर्मात्यांनी कलाकारांचे तंत्रज्ञांचे पैसे बुडवल्याच्या, सेट वर चुकीची वागणूक दिल्याच्या घटना वारंवार समोर येत आहेत. याच विषयावर अत्यंत परखड शब्दात भाष्य केले आहे ते अभिनेत्री शिल्पा तुळसकरने. शिल्पाने अत्यंत मोजक्या शब्दात निर्मात्यांची पोलखोल केली आहे.

अभिनेत्री शिल्पा तुळसकर सध्या 'तू तेव्हा तशी' या मालिकेतून घराघरात पोहोचली आहे. या मालिकेत तिने 'अनामिका' हे पात्र साकारले असून ती चाहत्यांच्या मनावर अधिराज्य करत आहे. शिल्पाने केवळ मराठीच नाही तर हिंदीमध्येही बरेच काम केले आहे. आजवर अनेक वेगवेगळ्या भूमिका मालिका-



सिनेमातून साकारल्या आहेत. शिल्पाला मनोरंजन विश्वातील दांडगा अनुभव आहे. अनेक निर्मात्यांसोबत काम केल्याने निर्मात्यांचे गुण-अवगुण तिने चांगलेच हेरले आहेत. नुकत्याच झालेल्या एका मुलाखतीत तिने यावर रोखठोक भाष्य केले आहे.

शिल्पा म्हणाली, 'एका कलाकाराच्या निर्मात्याकडून काय माफक अपेक्षा असतात. तर एक स्वच्छ मेकअप रूम, एक स्वच्छ वॉशरूम, वेळेवर ब्रेक्स, काम वेळेवर पूर्ण करणं आणि कलाकाराला लागणाऱ्या प्रॉपर्टी पुरवणं. या अगदी बेसिक गोष्टी अपेक्षित असतात.' पुढे ती म्हणाली, 'निर्माते एका चित्रपटातून किंवा कलाकृतीतून मिळणारी मिळकत लगेच दुसऱ्या प्रोजेक्टमध्ये लावतात. त्यामुळे हातात आलेली रक्कम गेल्याने लोकांची देणी थकतात. कलाकार तंत्रज्ञांचे मानधन थकवले जाते आणि यामुळे निर्मात्यांचं नाव खराब होतं. केवळ पैसे वेळेवर देणारा निर्माता उत्तम निर्माता होत नाही, तर रोजच्या रोज सेटवर या सगळ्या गोष्टींची दखल घेणंसुद्धा तितकंच महत्त्वाचं असतं.'

# फार गाजावाजा नाही, कुठलेही अजेंडे नाही.. तेजस्विनीची ही पोस्ट कुणासाठी?

आपल्या दर्जेदार अभिनयाने यशाची उंची गाठलेल्या अभिनेत्री तेजस्विनी पंडित (TEJASWINI PANDIT) ने मराठी मनोरंजन विश्वात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. एखाद्या भूमिकेतला सोज्वळपणा असो किंवा 'रानबाजार' सारखा बोल्डनेस, तिने सर्वच भूमिका लिलल्या पेलल्या आहेत. ती सोशल मिडियावर बरीच सक्रिय असते. जी ज्या आपुलकीने चाहत्यांशी संवाद साधते, तेवढ्याच तीव्रतेने टीकेला उत्तरही देते. त्यामुळे तिच्या सोशल मीडिया अकाऊंट कडे सर्वांचं लक्ष लागून असतं. आज तिने एक अशी पोस्ट शेयर केली आहे, ज्यामुळे सर्वांचं लक्ष वेधलं आहे. आज तिच्या पोस्टचा विषय आहे, आपल्या सर्वांच्या लाडक्या माई. म्हणजेच अनाथांची माय सिंधुताई सपकाळ. गतवर्षी माईंचं निधन झालं. त्यामुळे आज त्या आपल्यात नाहीत. आज त्यांच्या वाढदिवासानिमित्त एक पोस्ट तेजस्विनीने शेयर केली आहे. तेजस्विनी म्हणते, 'फार गाजावाजा नाही, कुठलेही अजेंडे नाही, गर्दी नाही, अत्यंत साधेपणानेएकाच व्यक्तिमत्त्वाला साजरा करण्यासाठी एकत्र आलो.... सिंधुताई सपकाळ!माई , आठवण यायला आम्ही तुम्हाला विसरलोच नाही...! उलट चित्रांमधून तुम्हाला पुन्हा अनुभवता आलं!' पुढे ती म्हणते, 'मित्रांनो,माईंच्या वाढदिवसाचं औचित्य साधून त्यांच्या स्मरणार्थ आयोजित केलेलं आणि प्रणव सातभाई ने काढलेलं



# काटा किर्रर्र... मेघा घाडगे

सुरेखा पुणेकर म्हणा किंवा मी म्हणा, आम्ही होतो तोपर्यंतच लोकांनी लोककला पाहिलेली आहे. पण

आत्ताच्या मुलींनी त्याचा जो व्यवसाय केलेला आहे तो पाहता, त्यांनी मर्यादा ओलांडल्या आहेत. म्हणजे व्यावसायिक लावण्या आम्हीही केलेल्या आहेत. पण आत्ताच्या पिढीला ही लावणी इतकी सोपी वाटायला लागलेली आहे की, वाटेल तसे एक्सप्रेशन्स, घाणेरडे हावभाव, अंगविक्षेप म्हणजे विकृतीचा कळस !!!... म्हणजे हे बोलतानाही मला त्रास होतोय की, आपल्या महाराष्ट्रातीलच लोकं याला इतकं प्रोत्साहन देत आहेत. - मेघा घाडगे

मराठी नाटक आणि चित्रपटांतून आपण तिला पहिले आहे. परंतु 'उत्तम



# कल्याणी जाधवचा अपघाती मृत्यू

मराठी टेलिव्हिजनवरील लोकप्रिय ठरलेली ‘तुझ्यात जीव रंगला’ या मालिकेतील अभिनेत्री कल्याणी कुरळे जाधव हिचा अपघाती मृत्यू झाला आहे. कोल्हापूरमधील हालोंडी सांगली फाटा या ठिकाणी एका डंपरच्या धडकेत तिचा मृत्यू झाला आहे. नुकत्याच काही दिवसांपूर्वी कल्याणीने हालोंडी सांगली फाटा येथे प्रेमाची भाकरी नावाचे हॉटेल सुरु केले होते. या हॉटेलमधून बाहेर पडत असताना एका डंपरच्या धडकेत तिचा दुर्दैवी मृत्यू झाला.




# टी20 विश्वचषकाचा इंग्लंड ठरला बादशाह!

## पाकिस्तानवर मात करत दुसऱ्यांदा कोरलं विश्वचषकावर नाव

**ॲडलेड। महाईन्यूज । वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियात सुरु असलेला टी२० विश्वचषकाचा आज समारोप झाला. टी२० विश्वचषकाचा अंतिम फेरीतील सामना रविवारी (१३ नोव्हेंबर) रोजी ऐतिहासिक मेलबर्न मधील एमसीजी म्हणजेच मेलबर्न क्रिकेट मैदानवर संपन्न झाला. टी२० विश्वचषकाचा अंतिम सामना पाकिस्तान आणि इंग्लंड यांच्यात आज मेलबर्न येथे खेळवला गेला त्यात इंग्लंडने पाकिस्तानला पाच गडी राखून पराभव करत टी२० विश्वचषकावर दुसऱ्यांदा नाव कोरले. बेन स्टोक्सने झुंजार अर्धशतकी खेळी करत संघाला विश्वचषक जिंकून दिला. मात्र मोक्याच्या क्षणी तीन गडी बाद करणाऱ्या सॅम करनला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.

पाकिस्तानने ठेवलेल्या धावांचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या इंग्लंडला पहिल्याच षटकात जबर धक्का बसला. मागील सामन्यात नाबाद अर्धशतक पूर्ण करणारा ॲलेक्स हेल्स शाहिन आफ्रिदीचा शिकार ठरला. चाचपडत खेळणारा फिल सॉल्ट केवळ दहा धावा करत बाद झाला. कर्णधार जोस बटलरने झटपट २६ धावा ठोकल्या. बटलर बाद झाला तेव्हा इंग्लंड संघ संकटात सापडला होता. मात्र, अनुभवी बेन स्टोक्सने हॅरी ब्रुकसह ३९ धावांची महत्त्वाची भागीदारी केली. अडखळत खेळत असलेल्या स्टोक्सने खराब चेंडू मिळतात नवाझ याच्यावर हल्ला चढवत इंग्लंडच्या विजयाचे दरवाजे खुले केले. मोईन अलीनेही वसीमला तीन चौकार ठोकत पाकिस्तानला सामन्यातून बाहेर नेले. मोईनने १३ चेंडूवर १९ धावांचे योगदान दिले. स्टोक्सनेच आपले अर्धशतक पूर्ण करून संघासाठी विजयी धाव काढली.



तत्पूर्वी, मेलबर्न येथील एमसीजी मैदानावर संपन्न झालेल्या या सामन्यात इंग्लडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. इंग्लंडच्या गोलंदाजांनी आपला गोलंदाजीचा निर्णय सार्थ ठरवत पाकिस्तानला निर्धारित २० षटकात ८ बाद १३७ धावांवर रोखले. फिरकीपटू आदिल राशिद व सॅम करनने उपांत्य सामन्यानंतर अंतिम सामन्यातही शानदार गोलंदाजी केली. दुसऱ्यांदा टी२०चा चषक जिंकण्याच्या इराद्याने मैदानात उतरलेल्या दोन्ही संघांनी विजयी संघात कोणताही बदल केला नाही. प्रथम फलंदाजीसाठी पाकिस्तानला इंग्लंडने आमंत्रित केले. पाकिस्तानसाठी बाबर आझम व मोहम्मद रिझवान यांनी २९ धावांची सलामी दिली. रिझवान या सामन्यात केवळ १५ धावा करून बाद झाला. युवा मोहम्मद हॅरिस या सामन्यात अपयशी ठरला. कर्णधार बाबरने २८ चेंडूवर ३२ धावांची संथ खेळी केली.

शान मसूदने ३८ तर शादाब खानने २० धावांचे योगदान दिले. इंग्लंडच्या गोलंदाजांनी धारदार गोलंदाजी करत एकही पाकिस्तानी फलंदाजाला मोठी धावसंख्या उभारू दिली नाही. सॅम करनने टी२० विश्वचषक अंतिम सामन्यात पाकिस्तानच्या फलंदाजीला खेळपट्टीवर तग धरू दिले नाही. त्याने ४ षटकात फक्त १२ धावा देत पाकिस्तानचे ३ फलंदाज बाद केले.



## टी२० विश्वचषक स्पर्धेतील टीम ऑफ द टूर्नामिंटमध्ये भारताच्या तीन खेळाडूंचा समावेश

### तीन भारतीय खेळाडूंचा समावेश

**ॲडलेड । महाईन्यूज । वृत्तसंस्था**

टी२० विश्वचषकाचे अधिकृत प्रसारक स्टार स्पोर्ट्सने टूर्नामिंटचा संघ जाहीर केला आहे. स्टार स्पोर्ट्सच्या टीम ऑफ द टूर्नामिंटमध्ये प्लेइंग-११ मध्ये विश्वचषकातील काही सर्वोत्तम संघातील काही सर्वोत्तम खेळाडूंचा समावेश करण्यात आला आहे. भारत आणि इंग्लंडच्या संघात सर्वाधिक खेळाडू आहेत. या दोन्ही संघात प्रत्येकी तीन खेळाडू आहेत. त्याचबरोबर पाकिस्तानचे दोन खेळाडू आहेत. न्यूझीलंड, झिम्बाब्वे आणि दक्षिण आफ्रिकेचा प्रत्येकी एक खेळाडू आहे. स्टार स्पोर्ट्सने टीम ऑफ द टूर्नामिंटमध्ये सलामीवीर म्हणून इंग्लंडच्या सलामीच्या जोडीचा समावेश केला. ॲलेक्स हेल्स आणि जोस बटलर हे अधिकृत प्रसारक संघात सलामीचे नेतृत्व करताना दिसतील. हेल्स आणि बटलर दोघेही या स्पर्धेत उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहेत. भारतासमोरचे १६९ धावांचे लक्ष्य त्यांनी एकही विकेट न गमावता पूर्ण केले. या स्पर्धेत भारताच्या दोन बलाढ्य फलंदाजांवर मधल्या फळीची जबाबदारी देण्यात आली आहे. ही जबाबदारी विराट कोहली




आणि सूर्यकुमार यांच्यावर सोपवण्यात आली आहे. या दोघांनी भारतीय संघाला उपांत्य फेरीत नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. कोहलीने या स्पर्धेत सहा सामन्यांत ९८.६७ च्या सरासरीने आणि १३६.४१ च्या स्ट्राईक रेटने २९६ धावा केल्या. तो टी२० विश्वचषकात सर्वाधिक धावा करणारा फलंदाज आहे. त्याच वेळी, सूर्यकुमार यादवने या विश्वचषकात सहा सामन्यांमध्ये ५९.७५ च्या सरासरीने आणि १८९.६८ च्या स्ट्राइक रेटने २३९ धावा केल्या. सर्वाधिक धावा करणाऱ्यांमध्ये तो सध्या तिसऱ्या क्रमांकावर आहे. यानंतर स्टार स्पोर्ट्सने पाचव्या क्रमांकावर ग्लेन फिलिप्सची निवड केली आहे. फिलिप्सने या विश्वचषकातही शतक झळकावले. त्याने विश्वचषकातील पाच सामन्यांमध्ये १५८.२७ च्या स्ट्राइक रेटने २०१ धावा केल्या. झिम्बाब्वेचा प्रसिद्ध अष्टपैलू खेळाडू सिकंदर रझालाही स्टार स्पोर्ट्सच्या सर्वोत्कृष्ट संघात स्थान मिळाले आहे.

# इंग्लंड विश्वविजेता; मन जिंकले पाकिस्तानने!

**इंग्लंड विरुद्ध पाकिस्तानच्या अंतिम सामन्यावर पावसाचे सावट होते खरे परंतु अखेरीस रसिकांना थरारक अंतिम सामन्याची मेजवानी मिळाली आणि बेनस्ट्रोकच्या संयमी फलंदाजीच्या जोरावर इंग्लंडने बाजी मारली. पाकिस्तान जरी हरले असले तरी कमी धावसंख्येचा बचाव करताना कशी देहबोली आणि आक्रमकता लागते हे त्यांच्या भेदक गोलंदाजीने त्यांनी दाखवून दिले.**



विशेष

सुनील शाळगावकर

क्रिकेट प्रशिक्षक

जॉस बटलर ने नाणेफेक जिंकून काहीशा ओलसर खेळपट्टीवर अपेक्षाप्रमाणे पाकिस्तानला फलंदाजी दिली आणि त्याच्या गोलंदाजांनी अचूक टप्प्यावर गोलंदाजी करून पाकिस्तानी फलंदाजांना जखडून ठेवले. शान मसूच्या अडोतीस धावा आणि बाबर आज आमच्या अडखळत केलेल्या बत्तीस धावांच्या जोरावर पाकिस्तानने एकशे अडोतीस धावांचे आव्हान इंग्लंड समोर ठेवले. इंग्लंडकडून मुख्य करून आदिल रशीद ने अचूक टप्प्यावर गोलंदाजी करताना धावा रोखल्या तसेच दोन बळी मिळवले.

धावा कमी असल्या तरीही इंग्लंडला सहज विजयी होऊन द्यायचे नाही या निर्धारानेच पाकिस्तानी गोलंदाज मैदानावर उतरले. शाहीन आफ्रिदी हॅरिस रौफ आणि नसीम शहा यांनी अतिशय आक्रमक आणि भेदक गोलंदाजी करून इंग्लिश फलंदाजांना अडचणीत आणले. जोस बोटलर ने सुरुवातीला काही चौकार मारले परंतु हॅरिस रौफ च्या बाहेर जाणाऱ्या अप्रतिम चेंडूवर रिजवान कडे झेल देऊन तो बाद झाला आणि सामन्यात रंगत आली. बटलर बाद झाल्यावर बेन स्टोक्स ने एका बाजूने शेवटपर्यंत किल्ला लढवला आणि इंग्लंडला विश्वचषकापर्यंत नेले.



हरी वृक्ष चा कॅश घेताना शाहीन आफ्रिदीला दुखापत झाली आणि सामन्याला पुन्हा कलाटणी मिळाली. जखमी शाहीन आफ्रिदी पुन्हा गोलंदाजी करणार नाही हे स्पष्ट झाल्यावर त्याच्या जागी कारला गोलंदाजी दिली आणि त्याच ठिकाणी बेन स्टोक्स आणि मोईन अली ने प्रति आक्रमण रचले आणि इंग्लंडचा विजयाचा मार्ग सोपा झाला.




मध्यंतराला इंग्लंड सामना सहज जिंकेल असे वाटत असले तरी पाकिस्तानी दिलेली लढत खरंच कौतुकास्पद होती. अतिशय जिगरबाज खेळ करून भेदक गोलंदाजी करून त्यांनी इंग्लंडचे बळी मिळवले खरे परंतु आफ्रिदीचे अनुपस्थिती मोक्याच्या वेळी त्यांना नडली. पन्नास ओवरच्या विश्वाच्याकात ऐन मोक्याच्या वेळी शांत संयमी खेळी करणाऱ्या बेन स्टॉपचा पुन्हा इंग्लंडचा तारणहार ठरला आणि शेवटपर्यंत किल्ला लढवत त्याने इंग्लंडला विजयी केले. अचूक डावपेच आणि नियोजनबद्ध खेळ हे इंग्लंडच्या विजयाचे गमक ठरले, तर पराभवाच्या खाडीतून अंतिम फेरीपर्यंत मारलेली मुसंडी आणि इंग्लंडला दिलेली थरारक लढत हे पाकिस्तानसाठी जमेची बाजू ठरली. विश्व विजेत्या इंग्लंड संघाचे मनःपूर्वक अभिनंदन..!